# उल्हासनगर महानगरपालिका
## माहिती व जनसंपर्क विभाग

दिनांक : १०/०६/२०२२

## प्रसिध्दी पत्रक (प्रेसनोट)

उल्हासनगर महानगरपालिकेचे प्रशासक तथा आयुक्त डॉ. राजा दयानिधी, अतिरिक्त आयुक्त डॉ. करुणा जुईकर व अतिरिक्त आयुक्त, श्री. जमीर लेंगरेकर, उप-आयुक्त (पर्यावरण) डॉ. सुभाष जाधव यांच्या मार्गदर्शनाखाली पर्यावरण विभागाच्या विभागप्रमुख श्रीम. विशाखा सावंत, लिपीक श्री. सयाजी घाटविसावे यांच्या नियोजनानुसार दिनांक ५ जुन, २०२२ रोजी जागतिक पर्यावरण दिनानिमित्त उल्हासनगर महानगरपालिकेच्या भाजी मार्केट क्र.१,भाजी मार्केट क्र.२, कृष्णा मंडळ येथील भाजी मार्केट, उल्हासनगर-४ येथे पर्यावरण जनजागृतीकरीता कापडी पिशव्यांचे वाटप करण्यात आले तसेच लालसाई गार्डन, कुर्ला कॅम्प, उल्हासनगर-५ येथे वृक्षारोपणाचा कार्यक्रम घेण्यातआला.

सदर पर्यावरण दिनाच्या कार्यक्रमामध्ये सार्व. आरोग्य विभाग तसेच पर्यावरण विभागाचे सर्व अधिकारी/कर्मचारी सहभागी झाले होते. जागतिक पर्यावरण दिनानिमित्त शहरातील नागरीकांना घरातुन वस्तु/भाजी, फळफळावळ इतर खरेदी करण्यासाठी बाहेर पडताना कापडी पिशवी जरूर घेईन तसेच प्लास्टीक पिशव्यांचा वापर करणार नाही अशा आशयाची हरीत शपथ देवुन महापालिकेतर्फे नागरीकांना अतिरिक्त आयुक्त श्री. जमीर लेंगरेकर, उप-आयुक्त (पर्यावरण) डॉ. सुभाष जाधव यांचेहस्ते कापडी पिशव्यांचे वाटप करण्यात आले.

सदर जागतिक पर्यावरण दिनामध्ये महापालिकेच्या सार्व. आरोगय विभागाचे, सहा. सार्व. आरोग्य अधिकारी, श्री. मनिष हिवरे, मुख्य स्वच्छता निरीक्षक, श्री. एकनाथ पवार, पर्यावरण विभागप्रमुख श्रीम. विशाखा सावंत तसेच सार्व. आरोगय विभागाचे सर्व स्वच्छता निरीक्षक, सफाई मुकादम व पर्यावरण विभागातील अन्य कर्मचारी उपस्थित होते.

10/06/22

For जनसंपर्क अधिकारी
उल्हासनगर महानगरपालिका

प्रत — योग्य त्या कार्यवाहिस्तव रवाना.

१) पत्रकार कक्ष, उल्हासनगर महानगरपालिका
२) सिस्टीम ॲनलिस्ट, माहिती तंत्रज्ञान विभाग, उल्हासनगर महानगरपालिका